IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# “महात्मा बसवेश्वर - समाज परिवर्तनाचे आद्य प्रवर्तक”

**डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड**
प्राध्यापक आणि विभाग प्रमुख
श्रीपतराव कदम महाविद्यालय, तालुका- शिरवळ, जिल्हा- सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*सामाजिक कार्य, स्त्री उध्दार चळवळ, आध्यात्मीक विद्यापीठाची स्थापना, दासोह, शिवानुभव मंटपाची स्थापना*

**ABSTRACT**

भारतीय समाजात समानता आणि विश्वबंधूता यांचा पुरस्कार करणाऱ्या सामाजिक परिवर्तनात मोलाचे कार्य करणाऱ्या आद्य प्रवर्तकांमध्ये महात्मा बसवेश्वरांचे नाव आदराने घेतले जाते. बाराव्या शतकातील भारतीय समाज अनेक बुरसटलेल्या विचारांनी, अंधश्रध्दानी, जातीवर्ण व्यवस्था आदि अविचारीपणाने साधलेले कर्मकांड, धर्माचरण या सारख्या बाबींनी ग्रासलेला होता. या सर्व बाबींमुळे सामाजाचा आणि व्यक्तीगत स्तरावर प्रत्येक व्यक्तीचा मानसिक-बौध्दीक विकासाला खीळ बसली होती. समाजाला आणि व्यक्तींना निष्क्रीय करणाऱ्या या बाबी दूर करण्याची आणि त्या दृष्टीने समाजाचे प्रबोधन करण्याची गरज असल्याची जाणीव महात्मा बसवेश्वरांना झाली. म्हणूनच त्यांनी आपल्या कार्याद्वारे आणि वचनांच्या माध्यमातून सामाजिक समतेचा पुरस्कार केला. बाराव्या शतकातील निष्क्रीय आणि दिशहिन झालेल्या समाजात स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. धार्मिक आणि सामाजिक समता निर्माण करणे हे त्यांच्या समाज परिवर्तनाच्या कार्याचे वैशिष्ट्य होते. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून त्यांच्या समाज परिवर्तनाच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Gaikwad, Premchand Gundu.** (2025). “महात्मा बसवेश्वर - समाज परिवर्तनाचे आद्य प्रवर्तक”. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **297–301**.

**प्रस्तावना:**

सामाजिक परिवर्तनवादी, विश्वगुरू आणि लिंगायत समाजाचे संस्थापक महात्मा बसवेश्वर यांचे बाराव्या शतकात आध्यात्मिक, वैचारिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात मोठे योगदान आहे. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म विजापूर जिल्हयातील बागेवाडी येथे ११३१ मध्ये वैशाख महिन्याच्या तिसऱ्या दिवशी झाला. एक सच्चे समाजसुधारक म्हणून त्यांची जनमानसात ख्याती होती. समाजात आध्यात्मिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांनी निर्गुण, निराकार, एकेश्वरवादी श्रध्देचा पुरस्कार केला. त्यांच्या कालखंडातील समाजात सर्वत्र धार्मिक कर्मकांडे, दांभिकता, स्त्री-पुरुष असमानता, स्त्री दास्यत्व, वर्णभेद, जातिभेद, या समाजकि स्वास्थ्याच्या दृष्टीने मारक ठरणाऱ्या कुप्रथा मोठ्या प्रमाणावर रुजलेल्या होत्या. समाजात परिवर्तन करताना त्यांना अल्लमप्रभू, चन्नबसवेश्वर, सिद्धरामेश्वर आणि अक्कमहादेवी अशा वचनकारांचे मोठे सहकार्य मिळाले. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, अध्यात्म, तत्वज्ञान शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रात त्यांनी नाविन्यपूर्ण आणि क्रांतीकारी विचार सजवले. कुशाग्र बुध्दीमत्ता उत्तम स्मरणशक्ती, निष्कलंक चारित्र्य, निस्वार्थ वृती इत्यादी गुण त्यांच्याकडे होते. बसवेश्वरांचे शिक्षण कुडलसंगम येथे जातवेद मुनींच्या मार्गदर्शनाखाली झाले. त्यांना लहानपणापासूनच शिवभक्तीची आवड निर्माण झाली होती. समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे आणि प्राप्त होणाऱ्या ज्ञानाकडे एका चिकित्सक वृत्तीने पहाण्याची सवय त्यांच्यात निर्माण झाली होती. ब्राम्हणी अहंकाराचा त्यांना तिटकारा होता, जे बुद्धीला पटत नाही ते त्यांना मान्य नव्हते. तत्कालिन समाजातील उच्चस्तरीय वर्गातील लोकांच्या अहंकारी, ढोंगी, आणि दुटप्पी वर्तनाने ते व्यथित होत असत. त्यातूनच समाजपरिवर्तनाचे विचार त्यांच्यात निर्माण झाले. महात्मा बसवेश्वर हे केवळ विचारशील तत्वज्ञ नव्हते तर विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन समाजाला एक सकारात्मक नवी दिशा देणारे महान विचारवंत आणि क्रांतीकारी असे समाजसुधारक होते. सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथे एकवीस वर्षे वास्तव्याच्या काळात त्यांनी वीरशैव लिंगायत समाजाचा आध्यात्मिक पाया रचला. शक्ती विशेषाद्वैताचे तत्वज्ञानाच्या माध्यमातून त्यांनी जाती विरहित असा आदर्श समाज घडवण्यात आपले सारे आयुष्य पणाला लावले. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून त्यांच्या या समाज परिवर्तनाच्या अलौकीक कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा** –

१) राजाभाऊ नवांगकर, (२०२२), यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या काळातील सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक-राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकून तत्कालिन सामाजिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने, समाजातील विषमता दूर करण्याच्या दृष्टीने महात्मा बसवेश्वर यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. अभ्यासाच्या माध्यमातून त्यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची आणि समाज परिवर्तनाच्या कार्याची प्रासंगिकता आधोरेखित केली आहे.

२) सुनीलदत्त गवारे, (२०२०), यांनी आपल्या प्रकाशित ग्रंथातून महात्मा बसवेश्वरांचे विचार मांडताना असे विधान केले आहे की- महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक विचार हे जगातील सर्व धर्मांच्या अस्तित्वाचा आशय साष्ट करतात. बसवेश्वरांच्या मते, 'दया' हाच प्रत्येक धर्माचा आशय आहे आणि 'दया' हेच प्रत्येक धर्मानुयायींचे किंवा व्यक्तींचे उदिष्ट असल्याचे लेखकाने आपल्या ग्रंथाद्वारे दर्शवले आहे. लेखकाने महात्मा बसवेश्वरांचे सताशास्त्रीय, ज्ञानमिमांसीय, नैतीक, वैश्विक इत्यादी विचारांवर समग्र भाष्य केले आहे.

३) रत्नाकर लक्षटे, (२०१६), यांनी आपल्या अभ्यास लेखाच्या माध्यमातून - मनुष्य जीवनाच्या कल्याणामध्ये बाधा ठरणाऱ्या अज्ञान, भोगवाद, चंगळवाद, वांशीक संघर्ष, दहशतवाद, कौटुंबिक हिंसाचार, ताण-तणाव इत्यादी बाबींचा नायनाट करण्याचे सामर्थ्य महात्मा बसवेश्वरांच्या तत्वज्ञानात असल्याने त्याची उपयुक्तता आजच्या सामाजिक परिस्थितीतही कशी उपयुक्त ठरते या बाबत विश्लेषणात्मक भाष्य केले आहे. त्याच बरोबर, महात्मा बसवेश्वरांनी सुखप्राप्तीच्या मार्गाने मार्गक्रम करणाऱ्या तत्कालीन समाज आणि धर्मव्यवस्थेत ज्या सुधारणा घडवून आणल्या होत्या त्यावरही समग्र चर्चा केली आहे.

४) शामाताई घोणसे, (२०२५), यांच्या मते, जाती भेदांचा तीव्र निषेध करीत समाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतलेले महात्मा बसवेश्वर हे सामाजिक समरसता तत्वाचे आद्य प्रवर्तक आहे. लेखिकेच्या मते, विधायक मार्गाने समाजात परिवर्तन व्हावे आणि या परिवर्तनाच्या माध्यमातून सभाज संस्थांचे रक्षण करावे या साठी सदैव प्रयत्नशील असलेल्या महात्मा बसवेश्वरांच्या

सामाजिकक कार्याचे प्रमुख तत्व हिंदू धर्म आणि त्यातून विकसित झालेल्या हिंदूत्वात सामावलेले आहे.

**अभ्यास पध्दती** –

प्रस्तुत अभ्यास दुय्यम माहितीवर आधारित आहे. अभ्यासला आवश्यक असणारी दुय्यम माहिती, महात्मा बसवेश्वरां संबंधीत विविध मासिकांमध्ये, जर्नल्समध्ये प्रकाशित झालेल्या साहित्याच्या माध्यमातून संकलीत करण्यात आली आहे. त्याच बरावर विविध इतीहास तज्ञांच्या अभ्यासपूर्ण लेखांमधूनही संकलित करण्यात आली आहे. प्रस्तुत अभ्यास हा वर्णनात्मक स्वरुपाचा आहे.

**महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक कार्य** –

महात्मा बसवेश्वरांना एक आदर्श समाज निर्माण करायचा होता. आदर्श समाजव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव ही मूल्ये अपेक्षित असतात. सत्ताधिशांचा, उच्चवर्णीयांचा स्वार्थ आणि वंचित बहुजन समाजात रुजलेल्या कुप्रथा, अंशश्रद्धा, हिंसा, इत्यादी बाबी आदर्श समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करतात. महात्मा बसवेश्वरांनी नेमक्या या बाबींचा विचार एक आदर्श समाजव्यवस्था निर्माण करताना केला होता. अधश्रध्दा, हिंसाचार हे समाजाला अधोगतीच्या मार्गावर नेतात हा विचार महात्मा बसवेश्वरांनी सर्वसामान्य लोकांमध्ये रुजवला. या पार्श्वभूमीवरच तत्कालिन समाजात रुजलेल्या अंधश्रध्दा, कालबाहय रुढी-परंपरां प्रथा विरुद्ध आपली भूमिका परखडपणे मांडली. ज्ञान-भक्ती-कर्म या त्रिसूत्रीचा अंगीकार करत धार्मिक कर्मकांडे, आणि जातीभेदा विरुद्ध जनमत तयार केले. तत्कालिन समाजातील प्रचलित जातीय उच्च-नीचता, स्त्री दास्यत्व, स्त्री-पुरुष असमानता या सामाजिक परिवर्तनाला बाधक ठरणाऱ्या अनिष्ट चालीरिती विरुध्द वाचा फोडून महात्मा बसवेश्वरांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थे विरुध्द बंड पुकारले. जाती-पातीच्या आधारावर कसलाही भेदभाव न करता आणि इतरांवर अवलंबून न रहाता आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या रोजीरोटी साठी स्वतः मेहनत करणे आवश्यक आहे. असा संदेश त्यांनी सर्वसामान्य जनतेला दिला. त्यांनी त्यांच्या वचनांच्या माध्यमातून सामाजिक समतेचा पुरस्कार केला. त्यांचे क्रांतीकारी धार्मिक आणि समाज परिवर्तनाच्या कार्याचा आढावा घेतला असता त्यातून मानवतावाद, भूतदया, जातीवर्ण व्यवस्थेचे निर्मूलन, आदर्श ठरणाऱ्या सामाजिक विचारांचा आणि ज्ञानाचा प्रसार या पंचसुत्रीच्या तत्वांचा प्रत्यय येतो. या कार्या व्यतिरिक्त त्यांनी इतर अनेक महत्वपूर्ण अशी समाजपरिवर्तनाची कार्य केली त्या संबंधीचा थोडक्यात आढावा पुढे घेतला आहे.

१) **स्त्री उध्दार चळवळ** - तत्कालीन भारतीय समाजात स्त्रीयांना कुटुंबात आणि समाजात गौण स्थान होते. त्याकाळी स्त्रियां पुरुष प्रधान समाज रचनेत गुलामा सारख्याच जगत असत. त्यांच्यावर सातत्याने अन्याय-अत्याचार होत असत, स्त्री म्हनजे उपभोग्य वस्तु अशीच धारणा समाजात रुजली होती. बालहत्या, सतीप्रथा, बालविवाह अशा अनिष्ट प्रथांमुळे त्यांचे जीवन हे अधिकच खडतर झाले होते. अशा पार्श्वभूमीवर स्त्रियांचे त्यागी आणि समाजाप्रती आणि कुटुंबाप्रती असलेले सेवाभावी वृत्तीची ओळख समाजाला करून देण्याचे मोठे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. समाजातील स्त्रियांचा उध्दार झाल्या शिवाय समाजाचा उध्दार होणार नाही, समाजात नवे परिवर्तन घडून येणार नाही हा त्यांचा दृष्टीकोन होता. म्हणून त्यांनी स्त्री उद्धार चळवळ व्यापक प्रमाणावर सुरु केली आणि या चळवळीच्या माध्यमातून, स्त्रियांना गुलामगारीच्या जोखडातून बाहेर काढून कुटुंबात आणि समाजात स्वातंत्र्य, समानता आणि सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. स्त्रियांच्या संबंधी असूलेल्या कुप्रथांचे निर्मूलन करून त्यांच्या आयुष्याला एक नवी सकारात्मक दिशा देण्याचे कार्य स्त्री उद्धार चळवळीद्वारे त्यांनी केले. त्यामुळे भविष्यात सुध्दा ही चळवळ पुढे नेणारी त्यांच्या कार्यकर्त्यांचा मार्ग सुकर सुकर झाला. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला, तसेच अंतरजातीय विवाहासही प्रोत्साहन दिले.

२) **आध्यात्मीक विद्यापीठाची स्थापना** - महात्मा बसवेश्वरांनी कर्नाटकातील कलचरी येथे आध्यात्वीक विद्यापीठाची स्थापना करून या विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांनी विश्वशांती आणि विश्वबंधुत्वाचा संदेश दिला, आणि आत्मोध्दार आणि समाजोद्धाराचे कार्य केले. माणसासारखाच दुसरा माणूस असूनसुध्दा त्याचा विटाळ दुसऱ्यांना का होतो ? असे अनेक अनुत्तरीत प्रश्न त्यांना पडले होते. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणाऱ्या वंचित समाजातील लोकांना त्यांचे खरे हक्क आणि

अधिकार प्राप्त करून देणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाचा प्रचार-प्रसार करण्याचे कार्य या विद्यापीठाद्वारे करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

३) **श्रम प्रतिष्ठा आणि व्यवसाय स्वातंत्र्याला प्रोत्साहन** - शारिरीक श्रम किंवा व्यवसाय हेच प्रतिष्ठित आहे, त्यातच स्वर्गमुख आहे असे विचार असणा-या महात्मा बसवेश्वरांनी "कायकवे कैलास" हा श्रमाला प्रतिष्ठा देणारा नवा सिध्दांत मांडला. कोणत्याही प्रकारचे श्रम हे हिन दर्जाचे नाहीत म्हणून प्रत्येक मनुष्याने आपली उपजीविका श्रम करूनच करावी असे सांगून समाजात श्रम प्रतिष्ठा वाढवण्यावर भर दिला. त्यांनी 'कायक' हे केवळ पैसा कमावण्यासाठी नाही आणि ते कर्मसिध्दांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर भर देण्यात आला आहे. त्यांच्या या सिद्धांता मुळे ग्रामोद्योगांना अधिक प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यवसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला. कायक या संकल्पनेद्वारे, भारतीय समाजाचा श्रमाकडे पहाण्याचा दृष्टीकोन हा सकारात्मक करण्याचा प्रयन महात्मा बसवेश्वर यांनी केला.

४) **दासोह** - महात्मा बसवेश्वरांनी मांडलेली अजून एक महत्वाची संकल्पना म्हणजे 'दासोह' आपल्याकडे गरजेपेक्षा जे अधिक आहे ते समाजाला देणे असा या 'दासोह' या संकल्पने मागचा विचार आहे. आपल्याला आपल्या गरजेपेक्षा अधिक काही मिळत असेल तर ते समाजाला परत करने अशी त्यांची विचारधारा होती. आज दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आर्थिक विषमतेच्या काळात 'दासोह' ही संकल्पना महत्वाची ठरते.

५) **शिवानुभव मंटपाची स्थापना** - महात्मा बसवेश्वरांनी आपल्या मंगळवेढ्याच्या वास्तव्यात शिवानुभव मंटपाची स्थापना केली. या मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक समस्या अडचणींवर तोडगा काढण्याच्या दृष्टीने चर्चा करीत. त्यांनी समाजातील अनिष्ठ रुढी-परंपरा, कुप्रथा इत्यादींना प्रखर विरोध करण्याच्या दृष्टीने आणि समाजातील प्रत्येक जाती-धर्मातील लोकांचा या कार्यात सक्रीय सहभाग असावा या दृष्टीने ही नवी यंत्रणा स्थापन केली. शिवानुभव मंटप हे केवळ धार्मिक कार्याचे केंद्र नव्हते तर एक क्रांतीकारी विचारांनी प्रेरित झालेल्या लोकांचे एक खुले व्यासपीठ होते. यात स्त्रियांनाही सहभागी करून घेतले जात होते. या माध्यमाद्वारे, 'वचन' साहित्याच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा अंधश्रद्धा निर्मूलन आणि मानवी हक्कां बाबत चर्चा केली जात असे.

**समारोप** –

प्राचीन भारतात बाराव्या शतकाच्या पूर्वाधात महात्मा बसवेश्वरांचे विचार आणि त्यांचे कार्य ही केवळ विशिष्ठ समाज किंवा प्रांता पुरताच मर्यादीत राहीला नाही तर आज ते संपूर्ण देशाला आणि देशातील प्रत्येक समाजाला प्रेरणादायी ठरतील असे आहेत. त्यांचे कार्य आणि विचारधारा समाजाला वैचारिक उन्नतीच्या दिशेने घेऊन जाणारे ठरले आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी सर्वच घटकांचा त्यांच्या विचारधारेत समावेश आहे. महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला असता असे निदर्शनास येते की, त्यांनी समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते. आज पर्यंत त्यांच्या प्रती केवळ धार्मिक दृष्टीकोनातूनच पाहिले जात होते, पण त्यांनी केलेल्या समाजपरिवर्तनाच्या कार्यातून आणि दासोह, कायक, स्त्री उध्दार अशा काही संकल्पनांद्वारे त्यांच्या विचारांचे वैश्विक मूल्याची जाणीव होते. एक महान सामाजिक परिवर्तनवादी क्रांतीकारी म्हणून त्यांचे कार्य आणि विचार आजही समाजाला निश्चितच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही, त्यांच्या विचारांचे, शिकवणूकीचे, तत्वज्ञानाचे चिंतन आणि आचरण म्हणजेच त्यांना दिलेली खरी आदरांजली ठरेल.

**संदर्भ**

१) राजाभाऊ नवांगकर, (२०२२), "महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक आणि धार्मिक कार्य," वर्ल्डवाईड इंटरनॅशनल इंटरडिसिप्लीनरी रिसर्च जर्नल, खंड. १, क्र. ७.

२) सुनिलदत्त गवारे, (२०२०), "संतांचे तत्वज्ञान" अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.

३) रत्नाकर लक्षटे, (2016), "महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान - सामाजिक उपयुक्तता," बसव पथ, अक. ५.

४) शामाताई घोणसे, (२०२५), "महात्मा बसवेश्वर आणि सामाजिक समरसता," विश्व संवाद केंद्र, पुणे यांचे प्रकाशन.

५) रत्नाकर लक्षटे, (२०१६), “२१ व्या शातकासाठी महात्मा बसवण्णा,” इंटरनॅशनल जर्नल ऑफ हयुमॅनीटीज अँड सोशल सायन्स रिसर्च, खंड २. क्र. ११.

६) बस्वराज स्वामी, (२००९), “क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर,” अमृता प्रकाशन, लातूर.

७) D. O. Siddappa, (2025), “A Sociological perspective on Basaveshwara's role in Indian Social Change," International Journal of Humanities and Social Science Research, Vol. 11, No.

८) शिवलिंग मेनकुदळे, (२०१६), “महात्मा बसवेश्वरांचे समतावादी विचार,” इंडीयन रिसर्च जर्नल ऑफ एक्सटेंशन एज्युकेशन, खंड. ६, क्र. ८.

९) भाऊ साहेब उमटे, (२०२०), “सामाजिक क्रांतीचे अग्रदूत-महात्मा बसवेश्वर,” स्वामी रामानंद तीर्थ संशोधन केंद्र, लातूर.